MHAH030043292022

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | - | १४/०६/२०२२ |
| नोंदणी दिनांक | - | १५/०६/२०२२ |
| निकाल दिनांक | - | १३/०४/२०२६ |
| कालावधी | - | ०३व.०९म.२९दि. |

निशाणी क्र. २६

भाग-अ

अहमदनगर येथील मुख्य न्यायदंडाधिकारी, अहमदनगर यांचे न्यायालयात
**(पिठासीन अधिकारी - एल. एस. पाढेण यांचे समोर)**
(J.O. Code No.MH001107)
पारीत दिनांक १३/०४/२०२६

नियमीत फौजदारी खटला क्र. ७७८/२०२२
सीएनआर क्र.एमएचएएच०३००४३२९२०२२

| | | |
|---|---|---|
| | गु. र. नं. ।४७/२०२२<br>पोलीस ठाणे - तोफखाना पोलीस ठाणे, जि. अहमदनगर | |
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन<br>मार्फत तोफखाना पोलीस ठाणे, जि. अहमदनगर | |
| सरकापक्षातर्फे | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख | |
| आरोपी | १. | अशोक भानुदास गिते<br>वय- २३ वर्षे, व्यवसाय- मजुरी,<br>रा. सौरभ कॉलनी, अहमदनगर |
| | २. | सोमनाथ भानुदास गिते<br>वय- २७ वर्षे, व्यवसाय- मजुरी,<br>रा. सौरभ कॉलनी, अहमदनगर |
| आरोपीतर्फे वकिल | श्री. ए. डी. गर्जे | |

भाग-ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची दिनांक | २१/०१/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | २१/०१/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १४/०६/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०६/०७/२०२२ |
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याची दिनांक | १७/१२/२०२२ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची दिनांक | १३/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | १३/०४/२०२६ |

| | |
|---|---|
| शिक्षा सुनविल्याचा आदेशाची दिनांक जर असेल तर | निरंक |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | पकडल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | अपराधाचा तपशिल | निर्दोषमुक्त केले किंवा शिक्षा केली | शिक्षा केली | संपरिक्षेदरम्यान आरोपीचा फौ. प्र. सं. कलम ४२८ प्रमाणे शिक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अशोक भानुदास गिते | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१)(अ)प्रमाणे नोटिस दिली | ०६/०७/२०२२ | भा.दं.वि.कलम १४३,१४७, ४५२,३२३, ५०४,५०६, | निर्दोष मुक्त केले | -- | -- |
| २. | सोमनाथ भानुदास गिते | | | | | | |

## न्यायनिर्णय

( दि.१३/०४/२०२६ रोजी घोषित केला. )

सदरचा खटला आरोपीं विरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ अन्वयेच्या गुन्हयांच्या संपरिक्षेकरीता चालविण्यात आला.

सरकारपक्षाप्रमाणे घटनेची हकीकत अशी की,

२. फिर्यादी पांडुरंग मारुती काळे हे श्रेयश नगर, तपोवन रोड, अहमदनगर येथे आपल्या एकत्र कुटूंबासह राहतात. दि. २१/०१/२०२२ रोजी सायंकाळी ६.३० वा. चे सुमारास त्यांचे घरासमोरील मैदानामध्ये अशोक गिते फिरत असताना फिर्यादीने ‘तु माझ्या घराकडे काय पाहतो’ असे विचारले त्याचा राग येऊन त्याने फिर्यादीस शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी घरी जाऊन बसला असता अशोक गिते हा सोमनाथ गिते व अनोळखी इसमांना घेऊन त्यांचे घरात घुसले. त्यांनी फिर्यादीला शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी फिर्यादीच्या दोन्ही मुली त्यांना सोडविण्यासाठी आल्या असता अशोक गिते याने त्यांना शिवीगाळ केली. तसेच ‘तु जर आमच्या नादी लागला तर तुला आणि तुझ्या मुलींना जिवंत सोडणार नाही’ अशी धमकी देऊन निघुन गेले. त्यामुळे फिर्यादीने आरोपीं विरुध्द तोफखाना पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली. तोफखाना पोलीस ठाणेचे, ठाणे अमंलदार यांनी आरोपीं विरुध्द गु.रजि.नं.।४७/२०२२ अन्वये भारतीय

दंड विधान कलम १४३, १४७, ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ प्रमाणे तक्रार नोंदविली.

३. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हेड कॉनस्टेबल सुधीर क्षिरसागर यांनी केला. त्यांनी पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. फिर्यादीचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले व तपासाअंती आरोपीं विरुध्द वरील कलमान्वये न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्वअधिकारी यांनी आरोपी विरुध्द नि. ०७ वरील कलमान्वये दोषारोप ठेवले. सदरचे दोषारोप त्याच्या भाषेत समजावून सांगण्यात आले. आरोपीचे निवेदन नि.८ व ९ प्रमाणे नोंदवले. त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून संपरिक्षेची विनंती केली.

५. प्रकरणाचे निश्चितीकरिता माझ्या विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झालेले असुन त्यावर माझे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक २१/०१/२०२२ रोजी सायंकाळी ०६.३० वा.श्रेयश नगर, तपोवन रोड, अहमदनगर येथे फिर्यादीचे घरासमोर आरोपींनी ३ ते ४ अनोळखी इसमासह बेकायदेशीर जमाव जमवून प्रत्येक आरोपी त्या जमावाचा घटक होता, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| २) | वरील नमुद तारीख, वेळेला व ठिकाणी आरोपींनी ३ ते ४ अनोळखी इसमासह बेकायदेशीर जमाव जमवून त्या जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी दंगा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ३) | वरील नमुद तारीख, वेळेला व ठिकाणी आरोपींनी ३ ते ४ अनोळखी इसमासह बेकायदेशीर जमाव जमवून त्या जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादीच्या घरात फिर्यादीला दुखापत करण्यासाठी किंवा दुखापतीची भिती घालण्याची पूर्व तयारी करुन गृह अतिक्रमण केले, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ४) | वरील नमुद तारीख, वेळेला व ठिकाणी आरोपींनी ३ ते ४ अनोळखी इसमासह बेकायदेशीर जमाव जमवून त्या जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण केली, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ५) | वरील नमुद तारीख, वेळेला व ठिकाणी आरोपींनी ३ ते ४ अनोळखी इसमासह बेकायदेशीर जमाव जमवून त्या जमावाचे | |

| | | |
|---|---|---|
| | समान उद्दीष्ट साधण्यासाठी फिर्यादी व साक्षीदाराचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यायोगे फिर्यादी व साक्षीदारांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे सार्वजनिक शांततेचा भंग झाल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ६) | वरील नमुद तारीख, वेळेला व ठिकाणी आरोपींनी ३ ते ४ अनोळखी इसमासह बेकायदेशीर जमाव जमवून त्या जमावाचे समान उद्दीष्ट साधण्यासाठी फिर्यादी व साक्षीदारास जिवे मारण्याची धमकी दिल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ७) | अंतिम आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. |

-कारणमिमांसा-

६. आरोपीं विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे एकुण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. फिर्यादी पांडुरंग काळे ((अ.सा.क्र.१) यांची साक्ष नि. १० प्रमाणे, त्यांची मुलगी गायत्री काळे (अ.सा.क्र.२) हिची साक्ष नि. २२ प्रमाणे व पुतणी श्रुती काळे (अ.सा.क्र.३) हिची साक्ष नि. २३ प्रमाणे नोंदविली. साक्षी दरम्यान फिर्याद नि. ११ वर शाबित झाली. आरोपींतर्फे घटनास्थळ पंचनामा नि. २४ मान्य केला. फिर्यादीने उलटतपासात महत्वाची कबुली दिल्यामुळे व इतर साक्षीदारांनी सरकार पक्षाला सहकार्य न केल्यामुळे सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणेच्या बयानात (नि.२५) आरोपींनी सर्व आरोप फेटाळले त्यांचे विरुध्द खोटी केस दाखल केल्याचे सांगितले.

७. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. ए. डी. गर्जे यांचा युक्तीवाद ऐकला.

मुद्दे क्र.१ ते ६ बाबतः-

८. मुद्दे क्र.१ ते ६ हे एकमेकांशी संलग्न असल्याकारणाने ते एकत्रीत चौकशी करीता घेतले. फिर्यादी पांडुरंग काळे (अ.सा.क्र.१) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटनेच्या दिवशी सायंकाळी ६.३० वा. दरम्यान तो कामावरुन आला व जेवण केले त्यावेळेस त्यांची मुलगी बाहेर भांडे घासत होती. त्यांचे घरासमोरील पटांगणात अशोक गिते व त्यांचे सोबत ४ ते ५ लोकांचे भांडण सुरु होते. त्याने भांडण करु नका असे त्यांना म्हटले असता अशोक गिते याने त्यांना शिवीगाळ सुरु केली व धक्काबुक्की केली. अर्धा तासानंतर अशोक गिते त्याचा भाऊ सोमनाथ गिते हे इतर ८ ते १० लोकांसह त्यांच्या घरात घुसले व त्याला त्यांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यांची मुलगी गायत्री सदर भांडण सोडविण्यास आली असता तिला त्यांनी

शिवीगाळ केली व आमच्या नादी लागला तर जिवाने मारुन टाकु अशी धमकी दिली. त्यामुळे त्याने पोलीस ठाण्यात जाऊन आरोपीं विरुध्द फिर्याद दिली. सदर फिर्याद नि. ११ व आरोपी अशोक गिते यास त्यांनी ओळखले. उलटतपासामध्ये त्याने घटनेच्या दिवशी त्याचे घरासमोर चालु असलेल्या भांडणामधील लोकांना ओळखत नसल्याचे, त्याने आरोपींना बघितले नसल्याचे व त्यांचेशी वैयक्तीक ओळख नसल्याचे मान्य केले. तसेच त्याला अनोळखी लोकांनी मारहाण केली तेव्हा आरोपी तेथे नसल्याचे सुध्दा मान्य केले. त्याचप्रमाणे तेथे जमा झालेल्या लोकांनी अशोक गिते व सोमनाथ गिते यांची नावे सांगितल्यामुळे त्याने पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याचे सांगितले. शिवाय सदर आरोपींनी त्याच्या मुलींना शिवीगाळ केली नसल्याचे मान्य केले. तसेच आरोपीं विरुध्द त्याची कुठलीही तक्रार नसल्याची बाब कथन केली.

९. गायत्री काळे (अ.सा.क्र.२) व श्रृती काळे (अ.सा.क्र.३) या फिर्यादीची मुलगी व पुतणी आहे. त्या दोघींच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी दि. २१/०१/२०२२ रोजी अशी कुठलीही घटना घडली असल्याचे नाकारले आहे. सरकारी वकिलांनी घेतलेल्या उलटतपासामध्ये सुध्दा कुठलीही महत्वपुर्ण बाब अभिलेखावर आणु शकले नाहीत.

१०. एकंदरित उपरोक्त पुराव्याचे अवलोकन केले असता फिर्यादीने केवळ आरोपी अशोक गिते व सोमनाथ गिते यांचे विरुध्द साक्ष दिली. परंतु उलटतपासात त्यांने आपल्या सरतपासाच्या उलट कबुली दिल्या. त्यामुळे त्याच्या पुराव्याचा सरकार पक्षाला उपयोग होणार नाही. तसेच उर्वरित साक्षीदारांनी सुध्दा सरकार पक्षाच्या कथनाला काहीही सहकार्य न केल्यामुळे त्यांच्या पुराव्याचा सुध्दा सदर गुन्हा सिध्द होण्यास उपयोग होणार नाही. त्यामुळे आरोपींनी आपल्या समान उद्देशाने गैरकायदेशीर जमाव जमवुन फिर्यादीचे घरात गृहअतिक्रमण केले व त्याला स्वच्छेने मारहाण व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली याबाबी सिध्द करण्यास सरकार पक्ष अपयशी ठरले या निष्कर्षाप्रत मी येतो व मुद्दा क्र. १ ते ६ चे उत्तर नकारार्थी देतो.

<u>मुद्दा क्र.७ बाबतः-</u>

११. आरोपीं विरुध्द सदरचा गुन्हा सरकारपक्ष सर्व संशयाच्या पलीकडे जाऊन सिध्द करण्यास अपयशी ठरल्याने आरोपीं निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.७ च्या निष्कर्षा दाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. आरोपी क्र.१ अशोक भानुदास गिते, क्र.२ सोमनाथ भानुदास गिते यांची भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ४५२, ३२३, ५०४, ५०६ सह

कलम १४९ प्रमाणेच्या अपराधामधून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तीक जातमुचलके व जामीनकदबे रद्द करणेत येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७-अ चे तरतुदीनुसार रुपये १५,०००/- प्रत्येकी वैयक्तीक जातमुचलका व जामीनकदबा द्यावा.

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.13 15:39:48 +0530

दि.१३/०४/२०२६.

( एल. एस. पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदनगर.

भाग-क

सरकारपक्षाच्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | पांडुरंग मारुती काळे (निशाणी ११ ) | फिर्यादी |
| २. | गायत्री पांडुरंग काळे (निशाणी २२ ) | साक्षीदार |
| ३. | श्रृती संजय काळे (निशाणी २३ ) | साक्षीदार |

निशाणी देण्यात आलेल्या वस्तु/ कागदपत्रे
सरकारपक्षातर्फे

| अ.क्र. | निशाणी | वर्णन |
|---|---|---|
| १. | ११ | फिर्याद |
| २. | २४ | घटनास्थळ पंचनामा |

LAXMIKANT SUDAMRAO PADHEN

Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID -6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.04.13 15:39:55 +0530

दि.१३/०४/२०२६.

( एल. एस. पाढेण )
मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदनगर.